MHSO200001682024

| | | |
|---|---|---|
| खटला दाखल दिनांक | : | २४/०१/२०२४ |
| खटला नोंदणी दिनांक | : | २४/०१/२०२४ |
| खटला निकाली दिनांक | : | १८/०३/२०२६ |
| कालावधी | : | वर्ष म दि |
| | | ०२ ०१ २२ |

**भाग – 'अ'**

**Form No. XXXII**
**(Title Page of the Judgment)**
**(Para 44(i) of Chapter VI of Criminal Manual)**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र. ३), ता. सांगोला, जि. सोलापूर**
**(पिठासीन अधिकारी : एस. एस. साळुंखे)**

**नियमित फौजदारी खटला क्र. ४१/२०२४** **अपराध क्र. ८६/२०२३**
**निशाणी क्र. ४३**

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | महाराष्ट्र शासन तर्फे<br>पोलीस निरीक्षक, सांगोला पोलीस ठाणे,<br>जि. सोलापूर |
| **सहाय्यक सरकारी अभियोक्ता** | श्रीमती एन. व्ही. पाटील |
| **आरोपी** | १. सत्यवान रावसाहेब गायकवाड<br>वय – ३५ वर्षे, व्यवसाय – शेती,<br>२. सुनिता सत्यवान गायकवाड<br>वय – ३० वर्षे, व्यवसाय – शेती, |

| | |
|---|---|
| | ३. अनिकेत सत्यवान गायकवाड |
| **आरोपी** | वय – १९ वर्षे, व्यवसाय – शेती, |
| | सर्व रा. पारे, ता. सांगोला, जि. सोलापूर. |
| **आरोपींतर्फे विधिज्ञ** | श्री. एम. बी. पुकळे |

## भाग 'ब'

**(Para 44(ii) of Chapter VI of Criminal Manual)**

| | | |
|---|---|---|
| १ | गुन्हा घडल्याचा दिनांक | ३०/०१/२०२३ |
| २ | प्रथम खबर अहवाल दिनांक | ३१/०१/२०२३ |
| ३ | दोषारोपपत्र दाखल झाल्याचा दिनांक | २४/०१/२०२४ |
| ४ | दोषारोप निश्चिती दिनांक | १०/११/२०२५ |
| ५ | पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २१/०२/२०२६ |
| ६ | न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | १८/०३/२०२६ |
| ७ | न्यायनिर्णयाचा दिनांक | १८/०३/२०२६ |
| ८ | शिक्षा सुनावणीचा दिनांक | -- |

## आरोपींचा तपशिल

| आरोपींची श्रेणी | आरोपींचे नाव | अटक दिनांक | जामीन दिनांक | गुन्हयाचे कलम | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा सुनावणी | बंदीवान म्हणून असलेला कालावधी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ करीता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ ते | वरील प्रमाणे | ०२/०२/२०२३ | ०६/०८/२०२५ | भा.दं.वि. कलम | निर्दोष | – | – |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०३ | | | | ४५२, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ | | | |

## भाग 'क'

**(Para 44(iii) of Chapter VI of Criminal Manual)**

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयीन साक्षीदारांची यादी –**

अ) अभियोग पक्षाचे साक्षीदार –

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| ०१ | सुमन दगडू माने | फिर्यादी |

ब) बचाव पक्षाचे साक्षीदार – निरंक.

क) न्यायालयीन साक्षीदार – निरंक.

**निशाणी कागदपत्रांची यादी –**

अ) अभियोग पक्ष –

| अ.क्र. | निशाणी क्र. | तपशिल |
|---|---|---|
| ०१ | ४० | फिर्याद वरील फिर्यादीचा अंगठा |

ब) बचाव पक्ष – निरंक.

क) न्यायालय – निरंक.

ड) भौतिक वस्तु – निरंक.

## न्यायनिर्णय

(घोषीत दिनांक – १८/०३/२०२६)

प्रस्तुत आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान (यानंतर भा.दं.वि. असा संक्षिप्त उल्लेख)

कलम ४५२, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केल्याबाबत खटला चालविण्यात आला.

२. अभियोग पक्षाचे कथन खालील प्रमाणे –

दिनांक ३१/०१/२०२३ रोजी फिर्यादी नामे सुमन दगडू माने, रा. पारे, ता. सांगोला, जि. सोलापूर यांनी सांगोला पोलीस ठाणे येथे हजर राहून फिर्याद दिली की, त्या वर नमूद ठिकाणी एकटयाच राहत असून मजुरीचे काम करतात व त्यांच्याकडे तीन शेळया असून त्यांची त्या देखरेख करतात. दि. ३०/०१/२०२३ रोजी सायं. ०५.३० वाजेच्या सुमारास त्या शेळ्या राखून घरी आल्या तेव्हा एक शेळी बांधत असताना दुसऱ्या दोन शेळया त्यांचे शेजारी सत्यवान गायकवाड यांच्या शेळयामध्ये गेल्याने त्याचा राग मनात धरुन सत्यवान रावसाहेब गायकवाड यांनी त्यांच्या शेळया हाकलून शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यामूळे त्या घराचा दरवाजा उघडून त्यांच्या घरात गेल्या. तेव्हा सत्यवान गायकवाड, अनिकेत गायकवाड, सुनिता गायकवाड व विधीसंघर्षीत बालिका मयुरी गायकवाड असे चौघेजण त्यांच्या घरात घुसले व त्यांना शिवीगाळ, दमदाटी करुन हाताने मारहाण करुन मुक्का मार दिला. सदरचे भांडण राधाबाई गंगाधर गायकवाड यांनी सोडविले. त्यानंतर त्यांच्या लक्षात आले त्यांच्या गळ्यातील दिड तोळयाचे सोन्याचे मणिमाळ भांडणात कुठेतरी पडून गहाळ झाले आहे. सबब, उपरोक्त नमूद इसमांविरुध्द रितसर कार्यवाही व्हावी.

३. सदर फिर्यादीवरुन प्रस्तुत आरोपींनी भा.दं.वि. कलम ४५२, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केल्याबाबत त्यांच्याविरुध्द सांगोला पोलीस ठाणे, जि. सोलापूर येथे गु.र.क्र. ८६/२०२३ नोंद करण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस नाईक डी. बी. भोसले यांनी केला. सदर गुन्ह्याचा सखोल तपास करून त्यांनी आरोपींविरुद्ध सबळ पुरावा आल्याने मे. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. प्रस्तुत आरोपींविरुध्द भा.दं.वि. कलम ४५२, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये या न्यायालयाने त्यांचेविरुद्ध दोषारोप नि.क्र. २६ वर तयार केले व सदरचा दोषारोप आरोपींना मराठीमध्ये वाचून दाखविला असता त्यांनी गुन्हा कबुल नसल्याचे न्यायालयासमक्ष

कथन केल्यामुळे आरोपींविरुध्द प्रकरण पुढे चालवण्यात आले.

**५.** आरोपींच्या विरुध्द ठेवण्यात आलेला दोषारोप शाबित करण्यासाठी अभियोग पक्षाद्वारे केवळ एक साक्षीदार म्हणजेच फिर्यादी सुमन दगडू माने (सा.क्र.१) यांची साक्ष नोंदविण्यात आली. परंतु, सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास समर्थन केले नाही. तसेच, आरोपी व फिर्यादी यांनी त्यांच्यामधील वाद न्यायालयाबाहेर मिटलेबाबत संयुक्त पुरसीस नि.क्र. ३८ खाली दाखल केली. तसेच, नि.क्र. ४१ वर मुळ फिर्यादीतर्फे पुरसीस दाखल करुन सदर प्रकरणात अधिकचा पुरावा देण्याचा नाही असे न्यायालयास कळवले. या सर्व बाबी विचारात घेता नि.क्र. १ वर आदेश पारीत करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

**६.** अभियोग पक्षाच्या पुराव्यामध्ये आरोपींचे विरुध्द ग्राहय धरण्याजोगे कुठलीही बाब न आल्याने आरोपींचे फौ.प्र.सं.क. ३१३ अन्वये निवेदन नोंदविण्यात आले नाही.

**७.** अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती एन. व्ही. पाटील व आरोपींतर्फे विधिज्ञ श्री. एम. बी. पुकळे यांचा युक्तीवाद ऐकला.

**८.** अभियोग पक्षाने सादर केलेला पुरावा व दोन्ही बाजुचा युक्तीवाद लक्षात घेता या केसच्या निर्णयाकामी पुढील मुद्दे उपस्थित होतात. ते खालील मिमांसेद्वारे निष्कर्षास काढत आहे.

| क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दि. ३०/०१/२०२३ रोजी सायं. ०५.३० वाजेच्या सुमारास मौजे पारे, ता. सांगोला, जि. सोलापूर येथे फिर्यादीच्या राहत्या घरात प्रस्तुत आरोपींनी एका विधीसंघर्षित बालिकेशी केलेल्या संगनमताच्या पुरस्सरणार्थ किंवा वैयक्तीकरित्या, फिर्यादीस दुखापत करण्याच्या पूर्वतयारीने त्यांच्या घरात अनाधिकारे प्रवेश करुन गृह अतिक्रमण केले व | नाही |

| | | |
|---|---|---|
| | त्याअन्वये भा.दं.वि. कलम ४५२ सह ३४ नुसार शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | |
| २. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमूद तारखेस, वेळी व ठिकाणी, प्रस्तुत आरोपींनी एका विधीसंघर्षित बालिकेशी केलेल्या संगनमताच्या पुरस्सरणार्थ किंवा वैयक्तीकरित्या, फिर्यादीस लाथाबुक्यांनी मारहाण करुन ईच्छापूर्वक दुखापत केली व त्याअन्वये भा.दं.वि. कलम ३२३ सह ३४ नुसार शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | नाही. |
| ३. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमूद तारखेस, वेळी व ठिकाणी, प्रस्तुत आरोपींनी एका विधीसंघर्षित बालिकेशी केलेल्या संगनमताच्या पुरस्सरणार्थ किंवा वैयक्तीकरित्या, फिर्यादीस शिवीगाळ करुन जाणीवपूर्वक अपमानित केले व सदर कृत्यामुळे त्यांचेकडून सार्वजनिक शांततेचा भंग होईल किंवा एखादा अपराध घडण्याची शक्यता असल्याची जाणीव असुनदेखील त्यांना तसे करण्यास प्रक्षोभित केले व त्याअन्वये भा.दं.वि. कलम ५०४ सह ३४ नुसार शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | नाही |
| ४. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमूद तारखेस, वेळी व ठिकाणी, प्रस्तुत आरोपींनी एका विधीसंघर्षित बालिकेशी केलेल्या संगनमताच्या पुरस्सरणार्थ किंवा वैयक्तीकरित्या, फिर्यादीस दमदाटी करुन फौजदारी धाकदडपशा केला व त्याअन्वये भा.दं.वि. कलम ५०६ सह ३४ नुसार शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | नाही |
| ५. | आदेश काय? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्रमांक १ ते ५ करीता –**

९. प्रस्तुत आरोपींवरील आरोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने केवळ एक साक्षीदाराची साक्ष नोंदवली. फिर्यादी सुमन दगडू माने (सा.क्र.१) यांनी त्यांच्या साक्षीत असे सांगितले की, त्यांना घटना काय घडली, कधी घडली व कोठे घडली याबाबत काही आठवत नाही. त्यांनी आरोपींविरुध्द सांगोला पोलीस ठाण्यामध्ये त्यांना शिवीगाळ केली, मारहाण केली तसेच त्यांच्या गळयातील सोन्याची मणीमाळ गहाळ झाली यासंदर्भात फिर्याद दाखल केली होती किंवा कसे याबाबत काही आठवत नाही. त्यांनी अभिलेखावरील फिर्यादीवर असलेला त्यांच्या डाव्या हाताचा अंगठा ओळखला मात्र त्यातील कथनाबाबत अनभिन्नता दर्शविली. उपरोक्त नमूद साक्षीदाराने अभियोग पक्षास समर्थन करत नसल्याचे कारण देऊन सरकारी वकीलांनी न्यायालयाच्या परवानगीने त्यांना उलटतपासात विचारता येण्याजोगी सूचक प्रश्न विचारली असता ते त्यांच्या सरतपासातील कथनावर ठाम राहीले आहेत. तसेच, त्यांनी त्यांच्यामध्ये व आरोपींमध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याची बाब मान्य केली आहे.

१०. प्रस्तुत प्रकरणात फिर्यादी ही महत्वाची साक्षीदार असून त्यांनी त्यांच्या साक्षीतून फिर्यादीतील मजकूराचे समर्थन केलेले नसून त्यातील मजकूर नाकारलेला आहे. फिर्यादी (सा.क्र.१) यांच्या साक्षीवरुन व नि.क्र. ३८ वरील तडजोड पुरसीस वरुन आरोपी व फिर्यादी यांची न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे स्पष्ट होते. एकंदरीत पुरावा पाहता, प्रस्तुत आरोपींनी फिर्यादीस दुखापत करण्याच्या पूर्वतयारीने त्यांच्या घरात अनाधिकारे प्रवेश करुन गृह अतिक्रमणे केला तसेच लाथाबुक्यांनी मारहाण करुन शिवीगाळ व दमदाटी केली या बाबी निःसंशयपणे शाबीत होत नाहीत. आरोपी व फिर्यादी यांच्यातील वाद आपसात तडजोड होऊन सामोपचाराने संपुष्टात आला असल्याने सदरील खटला प्रलंबित ठेवणे म्हणजे वेळेचा अपव्यय ठरेल. वरील विवेचनावरुन विचाराधीन मुद्दे संशयापलीकडे सिध्द झालेले नाहीत. सबब, मी मुद्दा क्र. १ ते ४ चे उत्तर नाकारार्थी देतो व त्यानुसार मुद्दा क्र. ४ करीता खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र. १ ते ३ नामे **सत्यवान रावसाहेब गायकवाड, सुनिता सत्यवान गायकवाड व अनिकेत सत्यवान गायकवाड** यांना भा.दं.वि. कलम ४५२, ३२३, ५०४, ५०६ सह

कलम ३४ प्रमाणे गुन्हा केल्याबाबत ठेवण्यात आलेल्या दोषारोपातून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपींनी यापूर्वी दिलेले जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहेत.

३. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७ (अ) चे पुर्ततेकामी आरोपींनी आज रोजी नव्याने प्रत्येकी रुपये १५,०००/- चे जामीन बंधपत्र व वैयक्तीक बंधपत्र द्यावे. सदरचे जामीन बंधपत्र व वैयक्तीक बंधपत्र आजपासून ०६ महिन्यांच्या कालावधीनंतर रद्द झाल्याचे समजण्यात यावेत.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला)

SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Digitally signed by SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Date: 2026.03.18 17:01:38 +0530

(**एस. एस. साळुंखे**)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
न्यायालय क्र. ३, सांगोला.

दि. १८/०३/२०२६.

**प्रमाणपत्र**

मी खात्री देतो की, सदर न्यायनिर्णयाच्या पीडीएफ फाईलमधील मजकूर हा मूळ न्यायनिर्णयाप्रमाणेच शब्दशः आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | वि. अ. डांगे |
| न्यायालय | : | न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, सांगोला. |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | : | १८/०३/२०२६ |
| पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेली दिनांक | : | १८/०३/२०२६ |
| निकाल अपलोड केलेले दिनांक | : | २०/०३/२०२६ |